# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्य शासनाच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायमस्वरूपी समाविष्ट करण्याबाबत

**(१) ११७४१ (२९-०६-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध विभागात गेली अनेक वर्षे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायमस्वरूपी समाविष्ट करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १२ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विविध विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-११-२०२२) :** (१) प्रश्नात उल्लेखिलेले दिनांक १२ डिसेंबर, २०२० चे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. मात्र या विषयाशी साधर्म्य असलेले दिनांक २२/०९/२०२० रोजीचे निवेदन मुख्य सचिव कार्यालयाकडून दिनांक ०६/१०/२०२० रोजी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे अग्रेषित करण्यात आले आहे.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य व इतर विरूध्द अनिता व इतर या न्यायालयीन प्रकरणांमध्ये दिनांक १२/०२/२०१६ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णयाअन्वये असे निर्देशित केले आहे की, कंत्राटी पध्दतीने निर्माण केलेली पदे कायमस्वरूपी समजण्यात येवू नये. मा.सर्वोच्च न्यायालयाचे उक्त निर्देश विचारात घेता, कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणे विधिसंगत ठरत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र कलाकार कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबत

**(२) ११९९० (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र कलाकार कल्याण मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मंडळाची थोडक्यात कार्यकक्षा व मंडळ स्थापनेच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१४-१०-२०२२) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र कलाकार कल्याण मंडळ स्थापनेबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अभ्यासाअंती संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्याकडून दिनांक १० फेब्रुवारी, २०२२, १० मे, २०२२ व २१ सप्टेंबर, २०२२ च्या पत्रान्वये अधिक माहिती मागविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) येथील सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता यांना सेवानिवृत वेतन व सेवा उपदान अदा करण्याबाबत

**(३) १२०५९ (३०-०३-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ११६११ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) येथील कार्यकारी अभियंता, श्री प्रमोद कुलकर्णी यांना कायमस्वरुपी सेवानिवृत वेतन व सेवा उपदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे काय तसेच श्री.कुलकर्णी यांना कायमस्वरुपी सेवा निवृत्तीवेतन व सेवा उपदान रक्कम देण्याबाबत आयुक्त यांना सूचित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सेवा निवृत्ती अधिकाऱ्यास निवृत्ती वेतन व सेवा उपदनाची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४)

- श्री.प्रमोद कुलकर्णी, कार्यकारी अभियंता हे दिनांक २८/०२/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत.

- श्री.प्रमोद कुलकर्णी यांच्या कार्यकारी अभियंता पदावरील पदोन्नतीस सर्वसाधारण सभेची मान्यता नसल्याचे लेखापरीक्षा विभागाने आक्षेप नोंदविले आहेत.
- त्यासअनुसरून श्री.कुलकर्णी यांच्या कार्यकारी अभियंता या पदावरील पदोन्नतीस कार्योत्तर मान्यता मिळणेकरीता सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर केले असता, सदर विषयावर चर्चा करून प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला आहे.
- सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेने नव्वद दिवसात निकालात न काढल्याने आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण-२ (स) मधील तरतूदीनुसार शासन मान्यता प्राप्त झाली असून, त्याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली व परभणी जिल्ह्यातील नगरपरिषदांच्या विकास आराखड्यांबाबत

**(४) १२१५८ (३०-०३-२०२२) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली व परभणी जिल्ह्यातील बहुतांश नगरपरिषदांचे विकास आराखड्यांचा कालावधी संपुष्टात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदेचा विकास आराखड्यांचा कालावधी संपलेला असताना सुध्दा शासनातर्फे नवीन विकास आराखडा तयार करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नव्याने अस्तित्वात आलेल्या नगरपंचायतींच्या विकास आराखड्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ अन्वये विकास योजना मंजूर होऊन अंमलात आल्यापासून २० वर्षात फेरतपासणी करु शकेल, अशा हिंगोली जिल्ह्यात वसमत व कळमनूरी या दोन नगर परिषद आहेत. तसेच परभणी जिल्ह्यात, परभणी महानगरपालिका आणि सेलू, मानवत व पूर्णा या तीन नगरपरिषद आहेत.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ अन्वये हिंगोली जिल्ह्यातील वसमत नगर परिषदेकरीता दिनांक ११/०२/२०२१ व कळमनूरी नगरपरिषदेकरीता दिनांक ०५/०२/२०२१ रोजी विकास योजना तयार करण्यासाठी इरादा जाहीर करण्यात आलेला आहे.

तसेच परभणी जिल्ह्यातील, परभणी महानगरपालिकेकरीता दिनांक २३/०८/२०१९, सेलू नगरपरिषदेकरीता दिनांक १२/०२/२०२१ व मानवत नगरपरिषदेकरीता दिनांक २३/०२/२०२१ रोजी विकास योजना तयार करण्यासाठी इरादा जाहीर करण्यात आलेला आहे.

(३) विकास योजना सुधारीत करण्याची कार्यवाही विहीत मुदतीत सुरु केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नगरविकास विभागामार्फत इंटरनेट यंत्र खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) १२२२० (३०-०३-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरविकास विभागामार्फत राज्यातील काही नगर परिषदाना कार्यालयीन कामकाजामध्ये इंटरनेट सेवेचा दर्जा योग्य राखण्यासाठी रुपये २ लाखांचे एक S.D.WAN (SOFTWARE DEFINED WIDE AREA NETWORK) यंत्र घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यंत्राचा तांत्रिक दर्जा मॉडेल नं. व मेक परस्पर ठरवून बाजारात उपलब्ध असलेल्या अन्य कंपन्याचे तत्सम दर्जाचे उपकरण रुपये ५०,०००/- प्रति उपकरण एवढ्या कमी किंमतीत उपलब्ध असताना रुपये २ लाखांचे उपकरण खरेदी करुन उपलब्ध करुन दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर यंत्र खरेदीत शासनाची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन गैरव्यवहाराची संपूर्ण रक्कम जमीन महसुलाप्रमाणे वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर यंत्राचा तांत्रिक दर्जा मॉडेल नं. व मेक, हे शासन निर्णय दिनांक ०९/०६/२०२१ अन्वये ठरविण्यात आलेले आहेत. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार सदर यंत्रे ही मूळ उपकरण निर्माता कंपनीकडून खरेदी करण्यात आलेली आहेत.

(३) सदर यंत्र खरेदी नियमानुसार शासन मान्यतेने झालेली असल्याने अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे भोनंग (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गट नं.४९० व गट नं.३६ या सरकारी गुरचरण मिळकतीमधील जागा ग्रामस्थांना गावठाण म्हणून मंजूर करणेबाबत

**(६) १२२२२ (३०-०३-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) मौजे भोनंग, ताजपूर व मालाडे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सुडकोली ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ ७० वर्षांपासून मौजे भोनंग येथील गट नं.४९० व गट नं.३६ मधील गावठाणामध्ये वास्तव्य करीत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावठाण जागेत राहत असलेल्या भोनंग, ताजपूर व मालाडे मधील झालेल्या लोकसंख्येच्या वाढीमुळे आता असलेले गावठाण क्षेत्र कमी पडत असल्यामुळे सदर ग्रामस्थांच्या गरजेनुसार गावठाण विस्तार करून नवीन गावठाण मिळणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावठाणामध्ये राहात असलेल्या भोनंग, ताजपूर व मालाडे मधील ग्रामस्थांनी सदर गावठाणाला लागून असलेल्या सरकारी जागेमध्ये ग्रामस्थांना गावठाणासाठी प्लॉट मिळण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मौजे भोनंग, ताजपूर व मालाडे (ता.अलिबाग, जि.रायगड) सुडकोली ग्रामपंचायत हद्दीतील मौजे भोनंग, ताजपूर व मालाडे येथील ग्रामस्थांना मौजे भोनंग येथील गट नं.४९० व गट नं.३६ या मिळकतीला लागून असलेल्या मिळकतीमधील जागा ग्रामस्थांना गावठाणसाठी प्लॉट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
अशा प्रकारची मागणी ग्रामस्थांकडुन जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे प्राप्त झालेली नाही.
(४) व (५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## मौजे पागोटे (ता.उरण) येथील ३५ एकर जमिनीवर खाजगी लॉजिस्टिक कंपन्यांनी बेकायदेशीर अतिक्रमण केल्याबाबत

**(७) १२२५३ (३०-०३-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट परिसरातील ३५ एकर सरकारी जमिनीवर खाजगी लॉजिस्टिक कंपन्यांनी सन २००७ मध्ये वा त्यादरम्यान बेकायदेशीर अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी कोकण विभागीय आयुक्तांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मा.राज्य महसूल मंत्री यांनीही दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोकण विभागीय आयुक्तांकडून चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीअंती सरकारी जमिनीवर अतिक्रमण करण्यात आलेल्या खाजगी कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे पागोटे येथील स.नं.१८१/१ (२) क्षेत्र १-८१.०० हे.आर व स.नं.१८१/२, क्षेत्र १-७६.०० हे.आर या शासकीय गुरचरण जमिनी जिल्हाधिकारी, कुलाबा यांचे दिनांक ३१/०३/१९४० चे आदेशान्वये श्री.काशिनाथ बाळू ठाकूर यांना शेती लागवडीकरीता भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आल्या होत्या. सदर जमिनीमध्ये श्री.काशिनाथ बाळू ठाकूर यांचे वारसांनी शेती न करता कंटेनर यार्ड या वाणिज्य वापर सुरु केल्याने शर्तभंग झाल्याने प्रकरणी शर्तभंग विषयक कारवाई सुरु करण्यात आली होती.

सदर प्रकरणी मा.राज्यमंत्री (महसूल) यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना दिनांक २६/०८/२०२१ च्या पत्रान्वये अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत सूचीत करण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी मा.मंत्री (महसूल) यांचे न्यायालयामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५७ अन्वये दाखल फेरतपासणी अपील अर्जावर मा.मंत्री (महसूल) यांचे दिनांक २२/०६/२०२१ च्या आदेशान्वये सदर शासकीय गुरचरण जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत आदेश पारीत केले असून त्यानुसार सदर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आले असून जमिनीचा ताबा शासनाने घेतला आहे. तसेच अतिक्रमण धारकांना ५,३९,४१,३००/- रुपये दंडाची रक्कम शासनजमा करणेबाबत सूचीत करण्यात आले होते. मात्र सदर दंडाची रक्कम अदा न केल्याने संबंधित अतिक्रमणधारकांच्या मौजे धुतूम, ता.उरण येथील इतर मिळकतींवर बोजा ठेवण्यात आलेला आहे.

---

## सावनेर नगरपरिषद (जि.नागपूर) च्या डिपी प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत

**(८) १२३८१ (३०-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर नगरपरिषद (जि.नागपूर) अंतर्गत लोकसंख्या वाढीनुसार अनेक नवीन लोकवस्त्या निर्माण होवून शहराची सीमावृध्दी झाल्यामुळे नगरपरिषद ने नवीन डिपी प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रस्तावास मंजूरी दिलेली नाही, डिपी प्रस्तावास मंजूरी ला विलंब लागत असल्याने शहर विकासाचे नियोजन व अनेक प्रस्ताव प्रलंबित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सावनेर नगरपरिषद च्या डिपी प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२२) :** (१) नाही. सावनेर शहराचा बराचसा भाग हा मंजूर प्रादेशिक योजना, नागपूर मध्ये "कोळसा बेल्ट" म्हणून दर्शविलेला असल्यामुळे वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (WCL) चे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. नगर परिषद सावनेर, व सहायक संचालक, नगर रचना शाखा कार्यालय, नागपूर व नागपूर विभागीय कार्यालयाकडून उक्त ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता WCL कडे पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु WCL कडून सादर ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे सावनेर शहराची विकास योजना तयार करणेबाबतची कार्यवाही अद्यापपावेतो स्थगित ठेवण्यात आलेली आहे. सावनेर नगर परिषदेने अद्यापपावेतो सुधारीत विकास योजना प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरीता सादर केलेला नाही.

(२) वर नमूद केल्याप्रमाणे सावनेर नगर परिषदेने सुधारीत विकास योजना प्रस्ताव शासनाकडे अद्यापपावेतो सादर केलेला नसल्याने त्यास मंजूरी देण्याची किंवा मंजुरीस विलंब लागत असल्याची बाब लागू ठरत नाही.
(३) व (४) वरील कारणास्तव प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील हुडकेश्वर-नरसाळा भागातील विकास आराखड्यास मंजूरी देण्याबाबत

**(९) १२३८२ (३०-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील हद्दवाढ झालेल्या हुडकेश्वर-नरसाळा भागातील (डि.पी. प्लॉन) विकास आराखडा शासनास सादर करण्यात आलेला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हुडकेश्वर-नरसाळा हा भाग महानगरपालिका हद्दीत समावेश करुन या भागाचा स्वतंत्र विकास आराखडा तयार करण्यात आलेला असून त्याला मान्यता देवून प्रस्ताव शासनाकडे मंजूरीकरीता सादर करण्यात आलेला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकास आराखड्याची मंजूरी मिळाली नसल्यामुळे विकास कामे प्रलंबित असून त्यामुळे नवीन बांधकामाबाबत मालमत्ता करासंदर्भात प्रशासकीय मान्यता घेता येत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील हुडकेश्वर-नरसाळा भागातील विकास आराखड्यास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२२) :** (१) व (२) होय.

शासन अधिसूचना क्र.नामपा-२०११/प्र.क्र.०१/नवि-२६, दिनांक १४/०५/२०१३ अन्वये मौ.हुडकेश्वर (बु.) आणि मौ. नरसाळा या महसुली गावांचे ९७२.८२ हेक्टर क्षेत्र नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. शासन अधिसूचना क्र.२४१३/४०५/प्र.क्र.२१३/२०१३/नवि-९ दिनांक १४/१०/२०१३ अन्वये या वाढीव क्षेत्रासाठी नागपूर महानगरपालिका यांना नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

तद्नंतर मौजा हुडकेश्वर-नरसाळा या दोन्ही महसूली गावांचा प्रारुप विकास योजना आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना कलम ३० अन्वये नागपूर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नरवि/१३३, दिनांक १३/०४/ २०१८ रोजी मंजुरीस्तव शासनास सादर केला होता.त्यावर शासनाने उक्त हुडकेश्वर-नरसाळा या गावांची प्रारुप विकास योजना नियोजनाच्या दृष्टीकोनातून शासन निर्णय क्र.टिपीएस-२४१८/८८४/प्र.क्र.८७/२०१९/नवि-९,दिनांक २७/०५/२०१९ अन्वये नामंजूर केली आहे.

नागपूर शहराच्या विकास योजने सोबत हुडकेश्वर नरसाळा या गावांच्या वाढीव हद्दीची विकास योजना एकत्रित करण्याकरीता बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे व मौजा हुडकेश्वर-नरसाळा या गावांकरीता विकास योजना मंजूर नसल्याने या गावातील विकास परवानगी देतांना उद्धवणाऱ्या अडचणींचा विचार करता या दोन्ही महसुली गावांकरीता स्वतंत्र रित्या नव्याने विकास योजना तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत असल्याचे नागपूर महानगरपालिकेने पत्र क्र.मनपा/नरवि/४०८, दिनांक ०३/०८/२०१९ अन्वये शासनास पुनःश्च कळविण्यात आलेले होते.

दरम्यानच्या काळात नागपूर शहराची विकास योजना सुधारीत करण्याकरीता विकास योजना विशेष घटकास शासनाने दिनांक २७/०५/२०१९ रोजी मंजुरी दिलेली असून विकास योजना विशेष घटक कार्यान्वित करण्यात आले आहे. नागपूर शहराच्या विकास योजने सोबत मौजा हुडकेश्वर व मौजा नरसाळा या दोन्ही गावांच्या हद्दींचा समावेश सुधारीत विकास योजनेमधे करुन या गावांसह नागपूर शहराची विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही सुरु आहे.

(३) मौजा हुडकेश्वर व मौजा नरसाळा या दोन्ही महसुली गावांचा समावेश महानगरपालिकेच्या हद्दीमधे शासन निर्णयानुसार दिनांक १४/१०/२०१३ रोजी करण्यात आलेला आहे. तद्नंतर ग्रामपंचायत नरसाळा यांच्याकडून करा संबंधित ९६२५ मालमत्तांचा अभिलेख (डाटा) व हुडकेश्वर ग्रामपंचायत यांचेकडून करा संबंधी ११४०२ मालमत्ता संबंधीचा अभिलेख (डाटा) महानगरपालिकेच्या कर निर्धारण विभागास प्राप्त झालेला आहे. तत्कालीन ग्रामपंचायत कार्यालयांद्वारा प्राप्त झालेल्या करा संबंधीच्या माहितीच्या आधारे यामधील बहुतांश मालमत्तांवर कर आकारणी करण्यात आलेली असून उर्वरित मालमत्तांवर कर आकरणीची कार्यवाही नागपुर महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(४) मुद्दा क्र.(१) व (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे नागपूर शहराच्या विकास योजने सोबत मौजा हुडकेश्वर व मौजा नरसाळा या दोन्ही गावांच्या हद्दींचा समावेश सुधारीत विकास योजनेमध्ये करुन या गावांसह नागपूर शहराची विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही नागपूर महानगरपालिकास्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुट्टीबोरी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथे नायब तहसिलदार कार्यालय सुरू करण्याबाबत

**(१०) १२६७६ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील तहसिल कार्यालय हिंगणा अंतर्गत बुट्टीबोरी हे नगरपरिषदेचे शहर असून येथे देशातील सर्वात मोठी औद्योगीक वसाहत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुट्टीबोरी येथे सुमारे ३५ ते ४० हजार कामगार वास्तव्यास असून बुट्टीबोरीशी २५ ते ३० खेडेगाव निगडीत असून या सर्वांना प्रशासकीय कामासाठी तहसिल कार्यालय हिंगणा किंवा जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर या २५ ते २५ कि.मी. अंतरावरील कार्यालयात जावे लागते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगणा तहसिल कार्यालय येथे जाण्यासाठी कोणतेही (एस.टी. स्टार बस) वाहतूक सोय नसल्याने खाजगी वाहनाशिवाय पर्याय उरत नाही. त्यामुळे लोकांना आर्थिक, मानसिक व शाररिक श्रम करावे लागत असल्याने बुट्टीबोरी येथे स्थायी स्वरूपी नायब तहसिलदार कार्यालय सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२०-१०-२०२२) :** (१), (२) व (३) नागपूर जिल्ह्यातील तहसिल कार्यालय नागपूर ग्रामीण अंतर्गत बुट्टीबोरी हे नगर परिषदेचे शहर आहे. व तेथे मोठी औद्योगिक वसाहत आहे.

नागपूर (ग्रा.) तहसिल कार्यालय येथे जाण्यासाठी एस.टी.स्टार बस वाहतूक सोय असून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस फेऱ्या नियमित सुरू असल्याने तसेच तालुक्यात नायब तहसिलदार यांची ४ पदे मंजूर असून नागरिकांची कामे विहीत वेळेत होत असल्याची वस्तुस्थिती आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नगरपरिषद रामटेक (जि.नागपूर) अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेच्या कामाच्या नकाशास मंजुरी मिळणेबाबत

**(११) १२६८७ (२३-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरपरिषद रामटेक (जि.नागपूर) अंतर्गत दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२०२० मधील कामाचे नकाशा मंजुरीचे प्रस्ताव सुचविलेल्या त्रृटी दूर करून नगररचना विभागाला पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत या कामाचे नकाशा प्रस्तावास मंजुरी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दलित वस्ती सुधार योजनेच्या कामाच्या नकाशास मंजुरी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०९-२०२२) :** (१) होय.

रामटेक नगर परिषदने पत्र क्र.१५४८, दिनांक ०४/१२/२०१९ अन्वये लोकशाहीर अन्नाभाऊ साठे नगर वस्ती सुधार योजनेंतर्गत नकाशा मंजूरीबाबतचे प्रस्ताव नागपूर शाखा कार्यालयास सादर केले होते. प्रस्तुत प्रकरणी नागपूर शाखा कार्यालयाने पत्र क्र.६१६, दिनांक १७/०३/२०२० रोजी छाननी शुल्काचा भरणा करणेबाबत तसेच त्रुटींची पुर्तता करणेबाबत रामटेक नगर परिषदेस कळविलेले होते. त्यावर रामटेक नगर परिषदेने पत्र क्र.५८९, दिनांक ०५/०८/२०२० अन्वये नकाशे व प्रमाणपत्र सादर केले. परंतु नागपूर शाखा कार्यालयाने सुचित केल्याप्रमाणे त्रुटींची पुर्तता न केल्यामुळे पुनश्च त्रुटींची पुर्तता करणेबाबत नागपूर शाखा कार्यालयाने पत्र क्र.३३५, दिनांक १८/०२/२०२१ अन्वये रामटेक नगर परिषदेस कळविले होते. त्या अनुषंगाने रामटेक नगर परिषदेने पत्र क्र.४८२, दिनांक २०/०७/२०२१ अन्वये सुधारीत नकाशासह प्रस्ताव नागपूर शाखा कार्यालयास सादर केले. परंतु सुधारित नकाशात देखील त्रुटींची पुर्तता न झाल्याने नागपूर शाखा कार्यालयाने पत्र क्र.१९५०, दिनांक ०१/१०/२०२१ अन्वये रामटेक नगर परिषदेने सादर केलेले १७ प्रस्ताव नामंजूर केले होते.

(२) व (३) तद्नंतर उक्त नामंजूर केलेल्या १७ प्रस्तावांपैकी १६ प्रस्ताव रामटेक नगर परिषदेने पत्र क्र.१४४४, दिनांक १२/०१/ २०२२ अन्वये नागपूर शाखा कार्यालयाकडे सादर केले असता त्यापैकी ११ प्रस्तावास नागपूर शाखा कार्यालयाने पत्र क्र.३१३, दिनांक ०४/०२/२०२२ अन्वये अटी व शर्तींचे अधीन राहून मंजूरी प्रदान केलेली आहे. उर्वरीत ५ प्रस्तावात त्रुटींची पुर्तता न केल्यामुळे नामंजूर करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## नागपूर शहरातील स्वस्त धान्य दुकानातील धान्य वाटपाच्या तक्रारीबाबत

**(१२) १२६९७ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १३२९५ ला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील स्वस्त धान्य दुकानातील शिधापत्रिकेमध्ये नाव असूनही अनेक नागरिक धान्यापासून वंचीत रहात असल्याबाबत अनेक तक्रारी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वस्त धान्य दुकानातील विक्री करुन उरलेल्या धान्यांची नोंद जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दयावी लागत असूनही अनेक दुकानदार या धान्याची परस्पर विक्री करत असल्याचा संशय निर्माण झाल्यामुळे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वस्त धान्य दुकानात वेळेवर धान्य न मिळणे, दुकान चालकांनी अरेरावी, प्रतीव्यक्ती तांदळाच्या वाटपात गैरव्यवहार अशा तक्रारी अधिकाऱ्याकडे आल्या असूनही याबाबत कुठलीही कार्यवाही जिल्हा प्रशासन करत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (२७-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## राज्य नाटय स्पर्धेत सहभाग घेतलेल्या कलावंतांचे मानधन व इतर देणी देण्याबाबत

**(१३) १२७०० (०१-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य नाटय स्पर्धेत सहभागी झालेल्या कलावंतांना पारितोषिकांचे मानधन, निर्मिती खर्च व इतर खर्च शासनाद्वारे देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१९ मध्ये झालेल्या राज्य नाटय स्पर्धेत सहभाग घेतलेल्या कलावंतांचे मानधन व इतर देणी अद्याप त्या कलावंतांना देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्य नाटय स्पर्धेत सहभाग घेतलेल्या कलावंतांचे मानधन व इतर देणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२७-०९-२०२२) :** (१) होय.
(२) नाही.
(३) सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील स्पर्धा आयोजित करीत असताना कोरोना विषाणू प्रादुर्भाव कालावधीतील निर्बंधामुळे काही स्पर्धा अपूर्ण राहील्या होत्या. तसेच पूर्ण झालेल्या स्पर्धांचे नाट्यनिर्मिती खर्च व पारितोषिक रकमा कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे प्रलंबित राहील्या होत्या. परंतु सन २०२०-२१ मध्ये सहभागी संस्थांना नाट्यनिर्मिती खर्च, प्रवासखर्च, दैनिक भत्ता व पारितोषिक रकमा इ. संबंधित संस्था/ कलाकार यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी कलावंत/ संस्था यांचे मानधन व इतर देणी प्रलंबित नाहीत. सन २०१९-२० या वर्षातील राज्य नाट्य स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ गोवा येथे आयोजित करण्याचे प्रस्तावित असून सहभागी संस्था/ कलाकार यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गुंठेवारी नियमित करणेबाबत

**(१४) १२७८६ (३०-०३-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये गुंठेवारी नियमितीकरण कायदा निर्माण केला. त्यास फेब्रुवारी अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे हे खर आहे काय,
(२) असल्यास, मुदतवाढ देण्यात आलेल्या गुंठेवारी नियमितीकरण कायदयांतर्गत ३१ डिसेंबर, २०२० पर्यंतची गुंठेवारी नियमित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कोणकोणत्या शहरामध्ये गुंठेवारी नियमितीकरण कायद्यांतर्गत गुंठेवारी व बांधकामे नियमित होणार आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शहरामध्ये गुंठेवारी नियमितीकरण कायदयाअंतर्गत गुंठेवारी व बांधकामे नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.

शासनाने महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील गुंठेवारी विकास नियमाधिन करण्याबाबतच्या पायाभूत दिनांकामध्ये दिनांक १ जानेवारी, २००१ ऐवजी दिनांक ३१ डिसेंबर, २०२० असा बदल केला असून याबाबतचा 'महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारित अधिनियम, २०२१' हा दिनांक १२/०३/२०२१ रोजी अंमलात आला आहे.

(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) गुंठेवारी विकास झालेल्या ग्रामीण व शहरी भागात गुंठेवारी नियमितीकरणाची कार्यवाही संबंधित नियोजन प्राधिकरणांनी करणे अपेक्षित आहे.

सदर अधिनियमाच्या प्रती पुढील कार्यवाहीसाठी सर्व नियोजन प्राधिकरणे/ विशेष नियोजन प्राधिकरणे/ जिल्हाधिकारी यांना पाठविण्याबाबत दिनांक २५/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी विभागातील शासन निर्णयानुसार दिव्यांग कर्मचारीवर्गांची पदे सुनिश्चित करून बढती देणेबाबत

**(१५) १२८४१ (३०-०३-२०२२) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाने विभागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांची वेतन श्रेणी व गुणवत्ता विचारात घेवून बढतीसाठीची पदे सुनिश्चित करून बढतीबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विभागाकडून अशी बढती कशा प्रकारे व किती जणांना देण्यात आली आहे,
(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आदिवासी विकास विभागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना तात्काळ बढती मिळावी, यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०४-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग-२५१९/प्र.क्र.०३/का.१५, दिनांक १६ जून, २०२१ व दिनांक ०१/०४/२०२२ रोजीच्या शासन शुध्दीपत्रान्वये आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील व त्यांचे अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय कार्यालयातील आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड मधील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित केलेली आहे.
(२) व (३) आदिवासी विकास विभाग शासन आदेश दिनांक १८/०५/२०२२ अन्वये सहायक प्रकल्प अधिकारी/संशोधन अधिकारी व तत्सम गट-ब या संवर्गातील एका पदावर तसेच अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, नागपूर व अमरावती या कार्यालयाकडून ३७ अशा एकूण ३८ दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यातील तळणी आणि ढोकसाळ (ता.मंठा) तसेच वाटुर (ता.परतूर) इ. गावांचा वरीष्ठ महाविद्यालयांच्या बृहत आराखड्यामध्ये समावेश करण्याबाबत

**(१६) १२८४७ (३०-०३-२०२२) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वरीष्ठ महाविद्यालयांच्या मंजूरीकरीता बृहत आराखडा मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील तळणी आणि ढोकसाळ तसेच परतूर तालुक्यामधील वाटुर या गावांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावांचा समावेश बृहत आराखड्यामध्ये करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१४-१०-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) सन २०२२-२३ या वर्षाच्या वार्षिक सम्यक योजनेत जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील "वाटूर फाटा" व मंठा तालुक्यातील "ढोकसाळ" या गावांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विदर्भ पटवारी संघटना आणि नागपूर जिल्ह्यातील राजस्व मंडळ अधिकारी संघटनेचे सदस्य माहे २३ डिसेंबर २०२१ पासून सामूहिक रजा आंदोलन करीत असल्याबाबत

**(१७) १२९७६ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भ पटवारी संघटना आणि नागपूर जिल्ह्यातील राजस्व मंडळ अधिकारी संघटनेचे सदस्य दिनांक २३ डिसेंबर २०२१ पासून सामूहिक रजा आंदोलन करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे काय,

(२) असल्यास, या आंदोलनामुळे काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील शेतकरी व नागरिकांची गैरसोय होत असून त्यांना सातबारा व आठ-अ ही प्रमाणपत्रे मिळणे बंद झाले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, पटवारी संघटना आणि नागपूर जिल्ह्याची राजस्व मंडळ अधिकारी संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. सदर आंदोलनादरम्यान नागपूर जिल्ह्याअंतर्गत काटोल तालुक्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी सामूहिक रजेवर असले तरी तालुक्यातील शेतकरी व नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणुन ई-सेवा केंद्रावर नमुना ७/१२ व नमुना ८-अ उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात आली होती.

(३) व (४) पटवारी संघटना व नागपूर जिल्हा राजस्व मंडळ अधिकारी संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना रजा आंदोलन मागे घेण्याकरीता त्यांचे समुपदेशन करण्यात आले.

संघटनेने सुरु केलेले रजा आंदोलन मागे घेत असल्याचे निवेदन सादर केलेले असून जिल्ह्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी दिनांक १०/०१/२०२२ रोजी पासून कामावर रुजू झाले आहेत.

---

## नागपूर महापालिकेला ४० इलेक्ट्रीक बस मिळण्याबाबत

**(१८) १३०७० (०६-०४-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेला केंद्र शासनाने सन २०१९ मध्ये १०० इलेक्ट्रीक बस देण्याचा निर्णय घेतला असून दोन वर्षे होऊनही महानगरपालिकेस एकही बस मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने मागणी केलेल्या ४० इलेक्ट्रीक बस न देण्याची करणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर महापालिकेला ४० इलेक्ट्रीक बस मिळण्याकरीता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०९-२०२२) :** (१) हे खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेला केंद्र शासनाचे FAME-II योजनेंतर्गत सन २०१९ मध्ये १०० इलेक्ट्रीक बस देण्याचा निर्णय घेतलेला होता. तथापि, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने प्रथमत: ४० इलेक्ट्रीक बसेस घेण्याचा निर्णय घेतलेला असून त्यापैकी ०१ प्रोटोटाईप बस नोव्हेंबर, २०२१ ला महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

(२) बसेस पुरविठ्याकरीता निश्चित करण्यात आलेल्या पुरवठाधारकास करारनामा करुन बस पुरवठा करण्यास्तव कार्यादेश देण्यात आलेला होता, तथापि, कोव्हीड-१९ च्या प्रार्दुभावामुळे पुरवठादाराचे कार्यस्थळ बंद असल्याने उत्पादन होवू शकले नाही. त्यामुळे बसेसचा पुरवठा होण्यास विलंब झालेला आहे.

(३) उर्वरीत ६० मिडी ई-बसेस करीता केंद्र शासनाचे जड उद्योग विभागास अनुदान मागविण्याकरीता दिनांक १४/०१/२०२२ रोजी महानगरपालिकेच्यावतीने प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौदा, (जि.नागपूर) येथील क्रीडा संकुलाची स्वच्छता व नियमित देखभाल करण्याबाबत

**(१९) १३०९१ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौदा (जि.नागपूर) येथील १० वर्षापूर्वी बांधलेल्या तालुका क्रिडा संकुलात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अस्वच्छता पसरली असल्याने विद्यार्थ्यांना तेथे सराव करता येत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त क्रिडा संकुलातील अस्वच्छतेमुळे पोलीस भरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना शाळांच्या मैदानात जाऊन सराव करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सादर क्रिडा संकुलाची नियमित स्वच्छता, देखभाल व तेथे आवश्यक ती सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-१०-२०२२) :** (१), (२) व (३) कोविड-१९ चा प्रादुर्भाव निवळल्यानंतर मैदाने, संकुले खुली करण्यात आली असून सद्य:स्थितीत संकुलात व्हॉलीबॉल, कबड्डी, बॅडमिंटन व तायक्वांदो या विविध खेळांचे प्रशिक्षण सुरु असून समितीमार्फत नियमित स्वच्छता करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौदा (जि.नागपूर) तालुका कृषि कार्यालयाकडून शेतकऱ्यांना बोगस बियाणे देण्यात आल्याबाबत

**(२०) १३१०१ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौदा (जि.नागपूर) तालुका कृषि कार्यालयाकडून शासनाच्यावतीने शेतकऱ्यांना अनुदान तत्वावर सोयाबीन पेरणीच्यावेळी महाबीज कंपनीचे एमएसीएस ११८८ वाणाचे बियाणे देण्यात आले असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना महाबीज कंपनीचे देण्यात आलेले बियाणे गुणवत्तेनुसार नसल्याने शेतकऱ्यांना समाधानकारक उत्पादन व उत्पादन खर्चही निघाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१३-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नागपूर जिल्ह्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य) अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये सोयाबीन पिकाचे प्रात्यक्षिके राबविण्यात आले होते. या बाबी अंतर्गत १०० टक्के अनुदान तत्वावर महाबिज कंपनीचे MACS-११८८ या वाणाचे २६०.४० क्विं. बियाणे क्षेत्रीय स्तरावर शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले. या वाणाची लागवड ५३२.९५ हेक्टर क्षेत्रावर करण्यात आली होती.

या प्रात्यक्षिकांमध्ये नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यात सोयाबीन या पिकासाठी राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेने प्रमाणीत केलेले सोयाबीन MACS-११८८ या वाणाचे एकुण ३४.२० क्विं. बियाणे ११४ शेतकऱ्यांना अनुदान तत्वावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याची ६२.७० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली होती.

सदर पिकांची शास्त्रीय पध्दतीने बिज प्रक्रिया करुन लागवड करण्यात आली होती. या बियाण्याची उगवण क्षमता चांगली होती आणि सुरुवातीच्या काळात पिकांची कायिक वाढ उत्तम झालेली होती.

दरम्यान विदर्भात ऑगस्ट व ऑक्टोबर, २०२० मध्ये झालेल्या सततच्या पावसामुळे पिकाचे नुकसान झाले आहे. सदरचे नुकसान हे सदोष बियाणांमुळे झालेले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत महसूल व वन विभागाने निश्चित केलेल्या निकषांमध्ये ६५ मि.मि. पेक्षा जास्त पाऊस होणे अपेक्षित असून, शेती पिकांचे ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान होणे आवश्यक आहे. तथापि, ६५ मि.मि. पेक्षा कमी पाऊस झालेला असल्याने निकषानुसार नुकसान भरपाई अनुज्ञेय होत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.